महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर ,कोल्हापूर -४१६ ००४.
Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
Kolhapur Divisional Board, Rajendranagar, Kolhapur - 416 004.

Phone s: Chairman 2690829 [O] 2656044[R] Secretary 2691405[O] 2324079[R].
PBX – 2696101, 2696102, 2696103 FAX : [0231] 2690758 E-Mail :divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/७४५२ दिनांक :- १८/०३/२०२१.

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
जि.सातारा, सांगली व कोल्हापूर.

विषय:- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा एप्रिल-मे २०२१ परीक्षेकरीता प्रविष्ठ होणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सवलती मिळणेकरीता प्रस्ताव सादर करण्याबाबत.. ..

संदर्भ:- शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा क्र.संकीर्ण-२०१७/(११८/१७)एस.डी.-६ दिनांक १६ ऑक्टोबर २०१८ रोजीचा शासन निर्णय.

उपरोक्त विषयास अनुसरुन या विभागीय मंडळाच्या अधिकार क्षेत्रातील सर्व मान्यताप्राप्त शाळाप्रमूखांना कळविण्यात येते की, इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलीनुसार मूल्यांकनाबाबत व शैक्षणिक सवलतीसंदर्भात मार्गदर्शक सूचना **दिनांक १६ ऑक्टोबर २०१८** च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेल्या आहेत.

सदर शासन निर्णयान्वये विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांना मंडळाच्या परीक्षेमध्ये जादा वेळेची सवलत, लेखनिकाची सवलत, तसेच उत्तीर्ण होण्यासाठी मिळणाऱ्या जादा गुणांची सवलत, इ.दिव्यांग प्रकारानुसार सवलती देण्यात येतात. तथापि सदर दिव्यांग प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रस्ताव हे काही शाळांनी वेळेत सादर केलेले आहेत त्यांना मागणी प्रमाणे सवलती देण्याची कार्यवाही सुरु आहे. तथापि काही शाळांनी अद्याप पर्यंत प्रस्ताव सादर न केल्यामुळे अशा विद्यार्थ्यांना सवलती देण्याची कार्यवाही करता येत नाही. पर्यायाने असे विद्यार्थी उपरोक्त नमूद सवलतीपासून वंचित राहतात, असे मंडळाच्या निदर्शनास आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी एप्रिल-मे २०२१ मध्ये होणाऱ्या माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस अशा प्रवर्गातून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना हव्या असलेल्या सवलती मागणीचे शिफारसीचे प्रस्ताव मंडळाने निर्धारित केलेल्या विहित फॉर्मची मूळ प्रत जिल्हा शल्यचिकीत्सक (सिव्हील सर्जन) यांच्या प्रतीस्वाक्षरीने व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतीसह संबंधित शाळांनी दिनांक **०५ एप्रिल २०२१** पर्यंत सादर करावेत. असे प्रस्ताव व दिव्यांगाचे प्रमाणपत्र सादर न केल्यास शाळांनी जरी आवदेनपत्रामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असणारा कोड दर्शविला असला तरी त्यास सदरचा कोड रद्द करुन सामान्य विद्यार्थी म्हणून गणना करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तरी सर्व शाळा प्रमुखांनी वरील महत्त्वाच्या बाबींची नोंद घेवून त्यांच्या शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही, तसेच पालकांच्या तक्रारी येणार नाहीत, या दृष्टीने प्रयत्न करून उपरोक्त बाबत दिव्यांग विद्यार्थ्यांचे सर्व प्रस्ताव दिनांक **०५ एप्रिल २०२१** पर्यंत मंडळाकडे पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. जेणेकरुन परीक्षेसाठी असणाऱ्या सवलती विद्यार्थ्यास देणे शक्य हाईल. प्रस्ताव प्राप्त न झाल्यास दिव्यांग विद्यार्थी हा मंडळाच्या परीक्षेस देय असणाऱ्या विविध सवलतीपासून वंचित राहील्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.